तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,
३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी : २२६२०६०१, २२६९०६०२, २२६४११५०/५१ फॅक्स : २२६९२१०२
तार : EDUTECH E-mail : desk2a@dte.org.in web : http://www.dte.org.in

क्रमांक २अ/एडीएम/प्रवेश/२००७ दिनांक १४/६/२००७

## प्रेस नोट
## एमएचटी-सीईटी २००७

महाराष्ट्र शासनाने २००७-२००८ या शैक्षणिक वर्षात आरोग्य विज्ञान, अभियांत्रिकी व औषधनिर्माणशास्त्र या तीनही व्यावसायीक अभ्यासक्रमासाठी एकच सामाईक प्रवेश परीक्षा दिनांक १७ मे २००७ रोजी घेण्यात आली होती.

या परीक्षेचा निकाल १४ जून २००७ रोजी सकाळी १०.०० वाजंता जाहीर करण्यांत आला. विद्यार्थ्यांच्या गुणपत्रिका त्यांच्या कनिष्ठ महाविद्यालयामार्फत प्राप्त होतील. हा निकाल संचालनालयाच्या **www.dte.org.in** या संकेत स्थळावर उपलब्ध आहे. ही परीक्षा सर्व जिल्हा मुख्यालयाच्या ठिकाणी ४५५ केंद्रावर घेण्यात आली. परीक्षेसाठी १,७४,१८९ विद्यार्थी उपस्थित होते. अभियांत्रिकीसाठी १,४१,५१४ विद्यार्थी संख्या त्यापैकी मुले ९६,३४१ व मुली ४५,१७३ इतकी आहेत.

राज्यात प्रथम येण्याचा मान अकोला जिल्हयातील आर एल टी कॉलेज ऑफ सायन्स अकोला (अमरावती विद्यापीठ ) येथील श्री पियुषकुमार प्रविण पालन या विद्यार्थ्यांने मिळविला आहे. त्याने सामाईक प्रवेश परीक्षेत १०० टक्के गुण मिळविले आहेत. राज्यातील प्रथम १५ क्रमांकात असलेल्या विद्यार्थ्यांची नांवे खालीलप्रमाणे आहेत.

| अ.क्र | विद्यार्थ्यांचे नांव | प्राप्त गुण | राज्य गुणवत्ता यादी क्रमांक | विद्यापीठ |
|---|---|---|---|---|
| १. | श्री.पालन पियुषकुमार प्रविण | २०० | १ | अमरावती |
| २. | श्री.रांगणेकर नील दिलीप | १९९ | २ | मुंबई |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ३. | कुमारी शहा रिध्दी जयेश | १९८ | ३ | मुंबई |
| ४. | कुमारी वेर्णेकर देवयानी प्रकाश | १९८ | ४ | मुंबई |
| ५. | श्री.सहानी प्रशांत कुलभूषण | १९८ | ५ | मुंबई |
| ६. | श्री.जोगळेकर चिन्मय सुनिल | १९८ | ६ | शिवाजी |
| ७. | श्री.दवे मौलिक हितेश | १९७ | ७ | मुंबई |
| ८. | श्री.गोगटे मिहीर श्रीराम | १९७ | ८ | मुंबई |
| ९. | श्री.साने अभय विजय | १९७ | ९ | मुंबई |
| १०. | श्री. जैन रिकेश कमलेश | १९६ | १० | मुंबई |
| ११. | श्री.गाडे अक्षय बाळासो | १९६ | ११ | शिवाजी |
| १२. | श्री. मिस्त्री भावीक कमलेश | १९६ | १२ | मुंबई |
| १३. | श्री. नायक कार्तिक रविदास | १९६ | १३ | मुंबई |
| १४. | कुमारी ऐश्वर्या बाबु | १९६ | १४ | मुंबई |
| १५. | कुमारी पांचाळ प्रियांका माणिकराव | १९६ | १५ | स्वामी रामानंद तिर्थ मराठवाडा, नांदेड |

- सीईटीमध्ये ९५टक्के किंवा त्यापेक्षा अधिक गुण मिळविलेल्या विद्यार्थ्यांची संख्या २१७ इतकी आहे.
- ९०टक्के किंवा त्यापेक्षा अधिक गुण मिळविलेल्या विद्यार्थ्यांची संख्या १,०२८ इतकी आहे.
- ८०टक्के किंवा त्यापेक्षा अधिक गुण मिळविलेल्या विद्यार्थ्यांची संख्या ४,७९१ इतकी आहे
- ७०टक्के किंवा त्यापेक्षा अधिक गुण मिळविलेल्या विद्यार्थ्यांची संख्या ११,५६९ इतकी आहे

- ६०टक्के किंवा त्यापेक्षा अधिक गुण मिळविलेल्या विद्यार्थ्यांची संख्या २२,९३३ इतकी आहे
- सीईटी मध्ये ५५टक्के किंवा त्यापेक्षा अधिक गुण मिळविलेल्या विद्यार्थ्यांची संख्या ३१,०७१ इतकी आहे.
- सीईटी मध्ये ५० टक्के किंवा त्यापेक्षा अधिक गुण मिळविलेल्या विद्यार्थ्यांची संख्या ४१,४०८ इतकी आहे.

राज्यातील ५ स्वायत्त संस्थांची प्रवेश प्रक्रिया ११ जून २००७ रोजी सुरु झाली असून या महाविद्यालयासाठी १२वी च्या परीक्षेत पीसीएममध्ये ५० टक्के आणि सीईटी मध्ये कमीत कमी ११० गुण (महाराष्ट्रातील मागासवर्गीयांसाठी पीसीएम-४५ व सीईटी-१००गुण) अशी प्रवेशासाठी शैक्षणिक अर्हता आहे. प्रवेश अर्ज देण्याची अंतिम तारीख २० जून २००७ रोजी असून प्रत्यक्ष प्रवेश देण्याची प्रक्रीया शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, पुणे या ठिकाणी २६ जून २००७ रोजी सुरु होत आहे. यासंबंधीची अधिक माहिती 1) www.dte.org.in 2) www.coep.org.in 3) www.vjti.ac.in 4) www.udct.org.in, 5) www.sggs.ac.in 6) www.walchandsangli.ac.in या संकेत स्थळावर उपलब्ध आहेत. ५ स्वायत्त संस्थांमध्ये एकूण २००५ प्रवेशक्षमता आहे.

राज्यात अभियांत्रिकी व औषधनिर्माण पदवी अभ्यासक्रमासाठी (स्वायत्त संस्था वगळून) पुढीलप्रमाणे जागा उपलब्ध आहेत.

| अ.क्र. | अभ्यासक्रमाचे नांव | शासकीय/शासकीय अनुदानित व विद्यापीठ व्यवस्थापीत संस्थामधील जागा | विनाअनुदानित संस्थामधील जागा | एकूण जागा |
|---|---|---|---|---|
| १. | अभियांत्रिकी | २४५९(१२) | ४७०५७(१४६) | ४९५१६(१५८) |
| २. | औषधनिर्माणशास्त्र | ४३०(९) | ५७९५(९८) | ६२२५(१०७) |

शैक्षणिक वर्ष २००६-०७ व २००७-०८ साठी अभियांत्रिकी सीईटी साठी बसलेल्या विद्यार्थ्यांची सांख्यांकी माहिती

| २००६-०७ मध्ये बसलेले एकूण विद्यार्थी १,१६,४८२ | | २००७-०८ मध्ये बसलेले एकूण विद्यार्थी १,४१,५१४ | |
|---|---|---|---|
| मुले | मुली | मुले | मुली |
| ८०११४ | ३६३६८ | ९६,३४१ | ४५,१७३ |

अभियांत्रिकी व औषधनिर्माणशास्त्र पदवी अभ्यासक्रमांची प्रवेशप्रक्रिया जूनच्या शेवटच्या आठवडयात सुरु होईल. यासंबंधीची अधिसूचना वृत्तपत्रातून व संचालनालयाच्या संकेतस्थळावर जाहीर करण्यांत येईल.

पहिल्या ३० क्रमांकामध्ये मुंबई विद्यापीठाचे २०, शिवाजी विद्यापीठाचे २, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड-४, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद-१, संत गाडगेमहाराज अमरावती विद्यापीठाचे २ व पुणे विद्यापीठाचे -१ विद्यार्थी आहेत.

➢ एम बी ए / एम एम एस :

राज्यात एमबीए/एमएमएस पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमासाठी एकूण संस्था १२५ व एकूण प्रवेश क्षमता ९०६० इतकी आहे. सदर अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी एकूण ५९,६१२ प्रवेशअर्ज प्राप्त झालेले असून सीईटीसाठी ५८,३६० उमेदवार बसलेले होते व त्यापैकी जीडी/पीआयसाठी ३६,५०१ इतके उमेदवार हजर होते.

➢ एम सी ए :

राज्यात एमसीए पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमासाठी एकूण संस्था ६२ व एकूण प्रवेश क्षमता ३३९३ इतकी आहे. सदर अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी एकूण १०,१८० प्रवेशअर्ज प्राप्त झालेले असून सीईटीसाठी ९५१८ उमेदवार बसलेले होते व त्यापैकी ९३१५ इतके उमेदवार क्वॉलीफाय झालेले आहेत.

➢ **वास्तुशास्त्र पदवी :**

सदर अभ्यासक्रमाची सामायिक परीक्षा गुरूवार दिनांक २८.६.२००७ रोजी घेण्यात येणार आहे. त्याची अधिसूचना जाहीर करण्यात आलेली आहे.

➢ **हॉटेल मॅनेजमेंट अँड कॅटरिंग टेक्नॉलॉजी पदवी :**

सदर अभ्यासक्रमाची सामायिक प्रवेश परीक्षा शनिवार दिनांक ३०.६.२००७ रोजी घेण्यात येणार आहे.त्याची अधिसूचना जाहीर करण्यात आलेली आहे.

➢ **इयत्ता १० वी नंतरचे पदविका अभ्यासक्रम :**

सदर अभ्यासक्रमाची प्रवेश प्रक्रिया संबंधित संस्था स्तरावर इयत्ता १०वी चा निकाल घोषित झाल्यानंतरच्या दुस-या दिवसापासून सुरू होणार आहे. त्यासाठी उमेदवार माध्यमिक व उच्च माध्यमिक परीक्षा मंडळ, महाराष्ट्र राज्य पुणे यांची इयत्ता १० वी किंवा तत्सम परीक्षा किमान ५० टक्के (महाराष्ट्रातील मागासवर्गीयांसाठी ४५ टक्के ) गुण मिळवून उत्तीर्ण होणे आवश्यक आहे.

➢ **इयत्ता १२ वी नंतरचे पदविका अभ्यासक्रम ( सरफेस कोटींग टेक्नॉलॉजी, हॉटेल मॅनेजमेंट अँड कॅटरिंग टेक्नॉलॉजी, रबर टेक्नॉलॉजी, फार्मसी आणि वास्तुशास्त्र ) :**

सदर अभ्यासक्रमाची प्रवेश परीक्षा इयत्ता १२ वी चा निकाल घोषित झाल्यापासून दुस-या दिवसापासून संबंधित संस्थास्तरावर सुरू झालेली आहे.

( प्रा. एन. बी. पासलकर )
संचालक तंत्र शिक्षण,
महाराष्ट्र राज्य, मुंबई